नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २७२ Issue - 272 | वार मंगळवार दि. १८ फेब्रुवारी २०२५ Blow- Tuesday Date 18 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...



### ज्ञानेश कुमार यांची मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवड

नवी दिल्ली : ज्येष्ठ सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार यांची देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवड करण्यात आली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडून १९ फेब्रुवारी रोजी ते पदभार स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यांच्या निवड समितीने ज्ञानेश कुमार यांच्या नावाला मंजूरी दिली. त्यानंतर विधी व न्याय मंत्रालयाकडून याबाबतचा शासन निर्णय सोमवारी (१७ फेब्रुवारी) रात्री काढला. ज्ञानेश कुमार यांचा कार्यकाळ २६ जा-नेवारी २०२९ पर्यंत असणार आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपसह शिवसेनेच्या आमदार आणि नेत्यांना वाय दर्जाची सुरक्षा

## राज्यातील व्हीआयपी सुरक्षेचा आढावा; शिवसेना नेत्यांना निर्णयाचा सर्वाधिक फटका बसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सत्तास्थापना, खातेवाटप, पालकमंत्रिपद यावरुन सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेत सुरु असले-ली धुसफूस आता आणखी वाढली आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना घेतलेले काही निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याकडे राज्याचं नेतृत्त्व येताच फिरवले. त्यामुळे शिवसेनेत अस्वस्थता असताना आता आणखी एका निर्णयामुळे शिवसेनेत संतापाची भावना आहे. फडणवीस आणि शिंदे यांच्यात शीतयुद्ध सुरु असल्याची चर्चा असताना शिंदेंच्या नेत्यांची सुरक्षा कमी करण्यात आली आहे.

शिवसेनेच्या आमदार आणि नेत्यांचा वाय दर्जाची सुरक्षा देण्यात आली होती. आता त्यात कपात करण्यात आलेली आहे. शिवसेनेसोबतच भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांची सुरक्षादेखील कमी करण्यात आलेली आहे. ज्यांच्या जीवाला कोणताही धोका नाही, अशा शिवसेना नेत्यांची सुरक्षा कमी करण्यात आलेली आहे. मात्र यावरुन सेनेच्या नेत्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे आता यावरुन पुन्हा एकदा नाराजीनाट्य सुरु होण्याची शक्यता आहे.







राज्यातील व्हीआयपी सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर ज्या नेत्यांच्या जीवाला धोका नाही, त्यांची सुरक्षा कमी करण्याचा निर्णय झाला. शिंदेंच्या शिवसे-नेसह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची सुरक्षा कमी करण्यात आलेली आहे. भाजप नेते रविंद्र चव्हाण, प्रताप चिखलीकर यांच्यासह अनेकांनी सुरक्षा कमी करण्यात आलेली आहे.

शिवसेना नेत्यांना सुरक्षा कपातीच्या निर्णयाचा सर्वाधिक फटका बसणार आहे. शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांना याआधी वाय दर्जाची सुरक्षा होती. या आमदारांच्या पुढे-मागे पोलिसांची वाहनं असायची. तसंच आमदारांच्या घराबाहेरही पोलीस सुरक्षा असायची. ही सगळी सुरक्षा आता कमी करण्यात आलेली आहे. नव्या निर्णयानंतर शिंदेंच्या आमदारांच्या वाहनांच्या मागे, पुढे आता पोलिसांच्या कमी गाड्या असतील. तसंच त्यांच्या घराबाहेरील पोलीस बंदोबस्तही कमी करण्यात येणार आहे.

नव्या नियमानुसार शिंदेंच्या आमदारांसोबत आता केवळ एकच सुरक्षा रक्षक असेल. याबद्दल शिंदेंच्या आमदारांमध्ये संतापाची भावना आहे. सरकारी सुरक्षेचा लवाजमा घेऊन फिरणाऱ्या आमदारांना आता केवळ एका पोलिसासह फिरावं लागण-ार आहे. शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. तेव्हा त्यांच्यासोबत ठाकरेंची साथ सोडणाऱ्या आमदारांना वाय दर्जाची सुरक्षा दिली गेली. शिंदे मुख्यमंत्री असताना ही सुरक्षा कायम राहिली. पण आता फडणवीसांनी ती सुरक्षा कमी केली आहे.

## चेंगराचेंगरीच्या घटना टाळण्यासाठी केंद्र सरकारने आखली मोठी योजना; ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोन तयार करणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी (१५ फेब्रुवारी) रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण यात जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. ही चेंगराचेंगरी नेमकी कशामुळे झाली? याबाबत आता दिल्ली पोलीस आणि रेल्वे प्रशासन चौकशी करत आहे. मात्र, कुंभमेळ्याला जाण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर मोठी गर्दी झाल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडल्याची माहिती सांगण्यात येत आहे. चेंगराचेंगरीची घटना घडल्यानंतर आता केंद्र सरकार अलर्ट झालं आहे.

गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, आता नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर केंद्रीय राखीव पोलीस दल (उठझऋ) आणि दिल्ली पोलीस तैनात करण्यात आले आहेत. महाकुंभमेळ्यादरम्यान वाढत्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडिया



टुडेनी दिलं आहे.


वृत्तानुसार, चेंगराचेंगरी सारख्या घटना पुन्हा घडू नये किंवा अशा घटना टाळण्यासाठी रेल-वेने देशातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोन तयार करण्याची योजना आखली आहे. ६० पेक्षा जास्त रहदारीच्या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची अतिरिक्त गर्दी हाताळण्यासाठी होल्डिंग झोन तयार करण्यात येणार आहेत. तसेच संकट व्यवस्थापनासाठी 'एआय'ची देखील मदत घेतली जाणार असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. या बरोबरच स्थानिक अधिकारी संकट व्यवस्थापनाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देखील घेतील असंही सांगण्यात येत आहे. या बरोबरच 'एआय'सह तंत्रज्ञानाचा वापर गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी करण्यात येणार आहे. विशेषतः ट्रेनच्या विलंबाच्या वेळी हा वापर करण्यात येणार आहे. रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा १८ झाला असून त्यात ११ महिला व पाच मुलांचा समावेश आहे. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही चेंगराचेंगरी नेमकी कशामुळे झाली, याची चौकशी दिल्ली पोलीस आणि रेल्वेने सुरू केली आहे. रेल्वेने मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख, गंभीर जखमींना प्रत्येकी अडीच लाख तर किरकोळ जखमींना एक लाखाची मदत जाहीर केली. दरम्यान, शनिवारी रात्री १० च्या सुमारास चेंगराचेंगरी झाली जेव्हा ट्रेनच्या घोषणांमध्ये गोंधळलेल्या प्रवाशांनी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील अरुंद जिन्याने प्लॅटफॉर्म १६ च्या दिशेने धाव घेतली असता चेंगराचेंगरी झाल्याचं सांगितलं जातं. चेंगराचेंगरीची चौकशी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि इतर कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या चौकशीचा अहवाल लवकरच सादर होण्याची अपेक्षा आहे.

## सत्तेचे राजकारण देशाचा विकास करू शकत नाही : मंत्री नितीन गडकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : शहराबरोबरच ग्रामीण भागाचा जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत देश आत्मनिर्भर होउ शकत नाही. यासाठी ग्रामीण भागासाठी चांगले रस्ते, पाणी आणि वीज या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी इस्लामपूर येथे बोलताना केले.

इस्लामपूर येथे राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी या स्वायत्त अभियांत्रिकी संस्थेच्या नवीन विद्यार्थी वसतीगृह इमारतीचे आणि जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन केंद्रिय मंत्री गडकरी यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ. जयंत पाटील, खा. विशाल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश खाडे, अरूण लाड, रोहित पाटील, सुहास बाबर, माजी आमदार मानसिंगराव नाईक, शिवाजीराव नाईक,




संस्थेचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील आदींसह जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री गडकरी म्हणाले, महात्मा गांधी ९० टक्के लोक खेड्यात रा-हतात असे सांगत होते. मात्र, आज यापैकी ३५ टक्के लोक शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. हे स्थलांतर आनंदाने झालेले नाही, तर सुविधांच्या अभावाने झाले आहे. यातून शहरी भागात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. जीडीपीमध्ये २२ ते २४ टक्के वाटा उद्य-ोगाचा, ५२ ते ५४ टक्के सेवाक्षेत्राचा आहे, तर केवळ १४ टक्के वाटा ग्रामीण व शेतीचा आहे. जर ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर चांगले रस्ते, वीज, पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. हे झाले तरच भारत आत्मनिर्भर होउ शकतो. राजकारण हे केवळ निवडणुकीपुरतेच हवे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सांगितले होते, निवडून आला नाही तर तुम्ही पक्षाचे, आमदार, खासदार झाला तर जनतेचे आणि मंत्री झाला तर देशाचे हा विचार हवा. राजकारण हे विकासाचे हवे, केवळ सत्तेचे राजकारण देशाचा विकास करू शकत नाही. राजकारणात होणारी टीका ही मनावर फारशी घ्यायची नसते. केवळ बातम्यामधून उपस्थित केल्या जाणार्या शंकांमुळे संवेदनशील राहू नये.

यावेळी बोलताना आ. पाटील यांनी मंत्री गडकरी यांचे देशभर झालेल्या रस्ते विकासाचे श्रेय देत कौतुक केले. पेठ-सांगली रस्त्याचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६ टक्के कमी दराने निविदा मंजुरी होउनही चांगल्या दर्जाचे झाले आहे असे सांगत राज्यात मात्र २५ ते ४५ टक्के अधिक दराने रस्त्याची कामे होत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

**अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्नांना फुटली वाचा** | **हजारो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये ३५ हुन अधिक शासकीय विभागांच्या कामांचा घेतला गेला आढावा**

# नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली माढा तालुक्याची तब्बल १५ वर्षानंतर आमसभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १७ /०२/ २०२५ रोजी माढाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली माढा येथे आमसभेचे आयोजन करण्यात आले. यापूर्वी १५वर्षांपूर्वी आमसभा घेण्यात आलेली होती. त्यांनतर आज या आमसभेचे आयोजन करण्यात आले. या आमसभेचे सचिव म्हणून गटविकास अधिकारी श्री.महेश सुळे यांनी जबाबदारी पार पाडली.

सकाळी ११ते संध्याकाळपर्यंत तासनतास चाललेल्या या आम सभेला तहसीलदार, आमसभा सचिव तथा गटविकास अधिकारी, महावितरण कार्यकारी अभियंता, नगरपालिका मुख्याधिकारी, तालुका कृषी अधिकारी, शहर पोलीस



निरीक्षक, पोलीस निरीक्षक,सहा. पोलीस निरीक्षक यांच्यासह ३० हुन अधिक शासकीय विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख उपस्थित होते. सोबतच क्षेत्रीय स्तरावरील ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, केंद्रप्रमुख, सर्कल हे शासकीय कर्मचारी देखील उपस्थित होते. करमाळ्याचे आमदार श्री.नारायण आबा पाटील, जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, संजय कोकाटे, संजय पाटील घाटणेकर, संजय पाटील,नगराध्यक्षा मिनल साठे, विलास देशमुख, बाळास-ाहेब पाटील,जोती कुलकर्णी, ग्रामपंचायत सदस्यांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली. यासह सदर आमसभेला माढा तालुक्यातील हजारो नागरिकांनी उपस्थिती दिली.

प्रत्येक नागरिकाचे काम करणे वेगवेगळे विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे काम आहे तसे न झाल्यास मी हे काम जबाबदारीने पूर्ण करेल. मी छत्रपती शिवाजी महाराजांचा एक मावळा आहे, त्यांनी रयतेसाठी जी लोककल्याणकारी व्यवस्था उभी केली त्याचा पाईक होत तालुक्यातील शेवटच्या घटकांचे गाऱ्हाणे ऐकणे मी माझे कर्तव्य समजतो.

या सभेत उपस्थित नागरिकांनी सिना-माढा प्रकल्प विभाग, महाराष्ट्र






वीज वितरण विभाग, भूमी अभिलेख विभाग, महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन, नगरपालिका प्रशासन, वनविभाग यांसारख्या अन्य विभागांवर समस्यांचा पाढा सुरू केला असता त्या सर्वांच्या तक्रारी ऐकून संबंधितांना तक्रारींचे निवारण करण्याच्या सूचना दिल्या. सदर सभेत वेगवेगळ्या ठरावांना मंजुरी देण्यात आली..

आमसभेला पूर्वपरवानगी न घेता गैरहजर असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश आमदार पाटील यांनी सांगितले. माढा मतदारसंघातील अनेक बंधाऱ्यांची किंमती वाढवून जादा बिले काढण्यात आली, तसेच काम देखील निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचा तक्रारीच्या अनुषंगाने उपअभियंता यांच्याकडे केले असून तक्रारी असणाऱ्या कामांच्या चौकशीची करून निकाली काढण्यात यावेत अशा सूचना दिल्या.

आज घेण्यात आलेली आमसभा ही नुसती नाममात्र नसून या सभेत कुणाच्या तक्रारीचे निवारण झाले कुणाचे नाही या सर्व गोष्टींचे माझ्या कार्यालयात लवकरच उत्तरांची आमसभाचे आयोजन करण्यात येईल यावेळी संबंधित विभागांचे सर्व अधिकारी यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा मी आमदार अभिजीत पाटील घेणार असल्याचे सांगितले.

## संपादकीय....

### उपाययोजनांची गरज

चेंगराचेंगरीची चौकशी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि इतर कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या चौकशीचा अहवाल लवकरच सादर होण्याची अपेक्षा आहे. चेंगराचेंगरीची घटना घडल्यानंतर आता केंद्र सरकार अलर्ट झालं आहे. गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, आता नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर केंद्रीय राखीव पोलीस दल आणि दिल्ली पोलीस तैनात करण्यात आले आहेत. महाकुंभमेळ्यादरम्यान वाढत्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. चेंगराचेंगरी सारख्या घटना पुन्हा घडू नये किंवा अशा घटना टाळण्यासाठी रेल्वेने देशातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर होल्डिंग झोन तयार करण्याची योजना आखली आहे. ६० पेक्षा जास्त रहदारीच्या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची अतिरिक्त गर्दी हाताळण्यासाठी होल्डिंग झोन तयार करण्यात येणार आहेत. तसेच संकट व्यवस्थापनासाठी 'एआय'ची देखील मदत घेतली जाणार आहे. या बरोबरच स्थानिक अधिकारी संकट व्यवस्थापनाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देखील घेतील असंही सांगण्यात येत आहे. या बरोबरच 'एआय'सह तंत्रज्ञानाचा वापर गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी करण्यात येणार आहे. विशेषतः ट्रेनच्या विलंबाच्या वेळी हा वापर करण्यात येणार आहे. रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा १८ झाला असून त्यात ११ महिला व पाच मुलांचा समावेश होता. पुन्हा अशा घटना घडू नये, यासाठी केंद्राकडून विविध उपाययोजना आखल्यात जात आहेत.

# मराठी भाषा समृध्दीसाठी सोलापुरी साहित्यिकांचा आविष्कार

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून राज्य सरकारने या अनुषंगाने अनेक शासन निर्णय घेऊन मराठी राज्याचे भाषा धोरण जाहीर केले आहे. महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक साहित्यिकांनी मराठी भाषा वृध्दिंगत व्हावी, मराठी भाषेचा आविष्कार घडावा यासाठी आपल्या लेखणीतून मराठी भाषेला आगळा वेगळा साज चढविला आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी भाषेबरोबरच पाली, पाकृत, असामी, बंगाली या भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे या सर्व भाषा समृध्द होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयामुळे मराठी भाषेचा विकास आणि समृध्द होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्य संग्रह करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकण्याची सोय करणे, महाराष्ट्रातील १२ हजार ग्रंथांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा सर्व घटकांना भरीव मदत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला असून या अनुषंगाने साहित्य चळवळीचा इतिहास चाळला जात आहे.

सोलापूर ही जशी हुतात्म्यांची नगरी म्हणून ओळखली जाते तशी साहित्य चळवळीचे केंद्रस्थान म्हणूनही या शहराकडे पाहिले जाते. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी मराठी भाषेत वेगवेगळ्या माध्यमातून लेखन केले असून मराठी साहित्याला या लेखकांच्या माध्यमातून आगळा-वेगळा साज चढवला आहे. स्वातंत्र्य चळवळीपूर्वी सुरुवात झालेली मराठी साहित्याची चळवळ अजूनही सुरु आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सोलापूरचे कुर्बान हुसेन, मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा आणि जगन्नाथ शिंदे यांना हौतात्म्य पत्करावे लागले. याशिवाय स्वातंत्र्य शाहीर म्हणून कवी कुंजविहारी यांचेही नाव घेतले जाते. तसेच कवी संजीव, वि. म. कुलकर्णी, रा. ना. पवार इत्यादी बड्या साहित्यिकांनी मराठी साहित्यात सोलापूरचे नाव उज्ज्वल केले आहे. जन्माने सोलापूर जिल्ह्यातील असलेले आणि महाराष्ट्राच्या साहित्य व सांस्कृतिक इतिहासात स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे अनेक साहित्यिक आहेत. त्यामध्ये करकंबचे न्या. म. गो. रानडे, मोडनिंबचे न. चिं. केळकर, सोलापूरचे डॉ. य. दि. फडके, डॉ. जब्बार पटेल, बार्शीचे शाहीर अमर शेख, पंढरपूरचे द. मा. मिरासदार, माळशिरसचे ना. स. इनामदार, सोलापूरचे शरणकुमार लिंबाळे इत्यादी मान्यवर साहित्यिकांचा समावेश आहे. त्यानंतरच्या काळात डॉ. गो. मा. पवार, त्र्यं. वि. सरदेशमुख, सुरेखा शहा, विजया जहागिरदार, कवी दत्ता हलसगीकर, कवी लक्ष्मीनारायण बोल्ली, प्रा. राजेंद्र दास, निर्मलकुमार फडकुले, कवी माधव पवार, डॉ. सुहास पुजारी, प्रा. विलास पाटील, डॉ. व. ना. इंगळे, डॉ. भगवानदास तिवारी, डॉ. इरेश स्वामी, डॉ. राजशेखर हिरेमठ, शशिकला मडकी, डॉ. कृष्णा इंगोले, डॉ. वामन जाधव, डॉ. सूर्यकांत घुगरे, डॉ. महेंद्र कदम, योगिराज वाघमारे, मारुती कटकधोंड, पन्नालाल सुराणा, निशिकांत ठकार, डॉ. अर्जुन व्हटकर अशी अनेक साहित्यिकांची मांदियाळी सोलापूरच्या नगरीमध्ये दिसून येते. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन सोलापुरात २००६ साली करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्षपद मूळचे सोलापुरातील रहिवाशी असलेले मारुती चितमपल्ली यांना मिळाले. त्यांनी निसर्गाविषयी आणि प्राणीपक्ष्यांविषयी विपुल लेखन केले आहे. केंद्र सरकारने नुकताच त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविले आहे.

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मराठी भाषा वृध्दिंगत व्हावी, भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा तसेच ही भाषा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावी यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरणच जाहीर करण्यात आले आहे. पुढील २५ वर्षात मराठी भाषेचा विकास करणे शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये इत्यादींना मराठी भाषा विकासासाठी प्रोत्साहन देणे असे धोरण राज्य सरकारने जाहीर केले आहे. याशिवाय न्यायालयात आणि प्रशासकीय कामकाजात मराठी भाषा आवश्यक असल्याचे शासन निर्णय देखील घेण्यात आले आहेत. एकंदर केंद्र सरकारचे धोरण आणि राज्य सरकारचे धोरण यामुळे मराठी भाषा वृध्दिंगत होण्यास मदत होणार आहे.

**– उज्ज्वलकुमार माने, सोलापूर**
**संपर्क – ९९२२४२४६१९**

# संभाजी ब्रिगेडच्या विरोधात शिवधर्म फौंडेशन महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक आणणा काटे मैदानात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर : शिवधर्म फौडेशन महाराष्ट्र राज्य संघटने मार्फत संभाजी ब्रिगेड संघटना व संभाजी ब्रिगेड पक्ष नावाच्या संघटनेने आपले नाव बदलवे व यांच्या नावातील पहिले नाव हे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाचा एकेरी उल्लेख (संभाजी) करणारे आहे.

**दिपक आण्णा काटे यांनी दिला संभाजी ब्रिगेड ला इशारा**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र व स्वराज्याचे दुसरे छत्रपती आहेत. त्यानी हिंदू धर्मासाठी बलिदान दिले याची जाण तुम्हा आम्हला सगळ्यांना आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे महापुरुष आहेत हे ज्ञात असताना देखील संभाजी ब्रिगेड पक्ष आणि संघटना यांनी जाणून-बुजून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नावाचा उल्लेख एकेरी (संभाजी) करून तमाम हिंदूंच्या भावना दुखावलेले आहेत.

इलेक्ट्रिकल, प्रिंट मीडियामध्ये बातमी येताना किंवा दैनंदिन जीवनात या संघटने विषयी बोलताना जन माणसांमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी (संभाजी) उल्लेख होतो. आणि या गोष्टीचा संताप तमाम शंभू प्रेमींच्या मनामध्ये आहे. याची जाणीव म्हणून याआधी शिवधर्म फाउंडेशन मार्फत संभाजी ब्रिगेड यांना ३१ डिसेंबर पर्यंत नाव बदलण्याची वेळ दिली होती.

तरी देखील त्यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख थांबवलेला नाही. त्यामुळे आता यांच्या विरोधात शिवधर्म फौडेशन तसेच तमाम हिंदू जनता लढा द्यायला उभे राहील आहे.

ह्या लढ्याची सुरवात संविधानिक मार्गाने केली जाईल. संभाजी ब्रिगेड यांच्या विरोधात पुढील प्रमाणे आंदोलन व मोर्चे होतील.

महाराष्ट्रातील सर्व तहसील कचेरीसमोर एक दिवसीय लक्षणीय उपोषण.

निवेदन देणे दि. २०-२-२०२५

एक दिवशीय आंदोलन दि. २५-२-२०२५.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा.तसेच

**पहिला टप्पा**

२८-२-२०२५ निवेदन देण्यात येणार आहे व

१०-३-२०२५ पुणे,१२/३/२०२५ सोलापूर,१३/३/२०२५ सांगली,१८/३/२०२५ कोल्हापुर

२०/३/२०२५ सातारा २४/३/२०२५ अहिल्यानगर

२५/३/२०२५ छत्रपती संभाजी नगर २६/३/२०२५ ठाणे +रायगड असा पहीला टप्पा आंदोलनाचा असेल असी माहिती दिपक आण्णा काटे यांनी पत्रकार परिषदेत दिली

# विद्यार्थिनीचे भवितव्य अंधारात, पालकामध्ये मोठी नाराजी

## शिक्षकच बनला भक्षक..शिक्षणाधिकारी बनले शिक्षकाचे रक्षक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विश्वनाथ चव्हाण/अक्कलकोट : शैक्षणिक धडे देऊन विद्यार्थ्यांना घडवण्याची ताकद फक्त गुरुजीमधे असतात.जर गुरुजीनीच आपल्या वर्गातील विद्यार्थिनीशी अश्लील चाळे करून वासनेचा ज्ञान देत असतील तर खरा ज्ञान कोणाकडून घ्यावा, अलीकडे तर गुरुजींना वासनेचा मोह आवरेना.

अपवाद वगळता गुरुजी वासनेचा पायऱ्या चढल्या जात आहे. गुरूजी वासनेचा भक्षक बनले असतांना शिक्षण विभागाचे अधिकाऱ्यांनी मात्र गुरूजीचे रक्षक बनले आहे?

शैक्षणिक संस्थेत श्रीमंत,मध्यवर्गीय व गरिबांचे मुले गुरूजीकडून शिक्षणाचे धडे घेत असतात.परंतु अलीकडच्या काळात शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी घटना श्री स्वामी समर्थांच्या नगरीत घडल्या जात आहे. गुरूजीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीना वर्गातूनच बाहेरच्या ठिकाणी, सोबती घेऊन अश्लील चाळे करित असल्याची चर्चा तालुक्यात रंगत आहे.

बऱ्याच वेळी चित्रित व्हिडिओ लोकांनी केलेली आहे. प्रकरण वाढू नये म्हणुन संबंधितांकडून प्रकरण दाबले गेले.तालुक्यात शेकडो उदाहरण आहेत.समोर येऊन कोणीच बोलत नाहीत.त्यामुळे ज्ञान देणारे मात्र मोकाटच फिरत आहे.त्यांच्याविरुद्ध बोलण्याची व कारवाई करण्याची हिंमतच कोणाकडे नाही.

शिक्षणक्षेत्र हे पवित्र क्षेत्र मानले जाते.म्हणून शाळेला ज्ञानमंदिर म्हणतात.ज्ञानासारखं दुसरं पवित्र काहीही नाही.ज्ञान ही महान शक्ती आहे.शिक्षण हे दळण नसून वळण आहे.म्हणूनच शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.ते जो पिला तो गुरगुरल्याशेवाय राहणार नाही असे पूर्वज म्हणतात.परंतु अलीकडच्या काळातील गुरुजीं विद्यार्थ्यांना शिक्षणाचे ज्ञान देण्याऐवजी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीकडे पाहून



त्यांना गुदगुल्या होत आहे.काही दिवसापूर्वीच शैक्षणिक संस्थेमधे हादरून सोडणाऱ्या घटना घडल्या आहे.हा घृणास्पद प्रकार शरमेने मान खाली घालवणारा तेवढाच किळसवाणा लोकांना ऐकायला मिळत आहे.

खरं तर अश्या मस्तवाल प्राध्यापकांना शैक्षणिक विभागाने घरचा रस्ता दाखवला पाहिजे. परंतु नराधम...नामक शिक्षकाना शिक्षण विभागाच पाठीशी घातल्या जात आहे.त्या नराधम पापीला पाठीशी न घालता त्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर योग्य तो कारवाई करावी.त्यांच्या जागेवर इतरांची नेमणुक करावी.खरं तर तो प्राध्यापक आपल्या सेवेचा राजीनामा देऊन खुशाल वासनेचा बाजार मांडत फिरावा अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांनी दिली आहे.




**आनेक विद्यार्थिनींशी प्राध्यापकाने अश्लील वर्तन केल्याची माहिती समोर येत असतांना शिक्षण विभागाने याची दखल घेतली नाही.वास्तविक विद्यार्थिनीचे भवितव्य अंधारात येत आहे.अशा मस्तवाल प्राध्यापकांना तडकाफडकी बडतर्फ करून त्यांची उच्चस्तरीय सखोल चौकशी करावी. चौकशी अंतिम दोषीवर कठोर कारवाई करावी.अन्यथा शिक्षण विभागाच्या विरोधात आम्हाला रस्त्यावर उतरावे.**

**– महांतेश हत्तुरे – शेतकरी सेना तालुका संघटक अक्कलकोट**



**अक्कलकोटच्या शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापकांनी वासनेचा खेळ वर्षानुवर्षे चालू ठेवले आहे.सत्य डोळ्यासमोर येत असताना कोणी त्यांच्याविरुद्ध बोलायला तयार नाही.संबंधित संस्था चालकांनी तात्काळ त्या प्राध्यापकांची कसून चौकशी करावे. आणि योग्य ती कारवाई करावी.अन्यथा संस्थेच्या विरोधात धरणे आंदोलन करण्यात येईल.**

**– शरण सुरवसे–विधानसभा संघटक, शिवसेना उबाठा, अक्कलकोट**

**योजनेसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही**

**तीन वर्षात योजना पुर्ण करण्यात येणार**

# स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सिंचन योजनेमुळे सांगोला तालुका पूर्णपणे दुष्काळमुक्त होणार : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजेनेचे काम सुरु होणार असल्याने १२ गावातील सुमारे १५ हजार ४०० हेक्टर जमीनींना बंदिस्त नलिकेव्दारे शेतीला लवकरच कायमस्वरुपी पाणी मिळणार आहे. यामुळे सांगोला तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरुपी संपून तालुका शंभर टक्के दुष्काळमुक्त होणार आहे असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला या योजनेच्या कामाचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, माजी खासदार रणजीतसिंह नाईक- निंबाळकर, माजी आमदार शहाजीबापू पाटील, दीपक साळुंखे पाटील, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता डॉ. ह.तु. धुमाळ, भीमा कालवा अधिक्षक अभियंता धीरज साळी यांच्या मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलताना म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्य दुष्काळ मुक्त करण्याचा संकल्प केला आहे. राज्यातील शेतकरी दुष्काळातून आता मुक्त झाला पाहिजे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या कामास शासनाने सुधारीत प्रशासकीय मंजुरी दिली या योजनेकरिता उजनी धरणामधून दोन टीएमसी पाण्याची तरतूद असून या पाण्याद्वारे सांगोला तालुक्यातील १२ गावातील सुमारे १३ हजार ५५ हेक्टर क्षेत्रास व सांगोला शाखा कालवा क्र. ५ अंतर्गत २ हजार ३४५ हे. असे एकूण १५ हजार ४०० हे. क्षेत्राचा सिंचनाचा लाभ मिळणार आहे. बऱ्याच वर्षापासून शेतकऱ्यांची मागणी यानिमित्ताने पूर्ण होत असून कायमस्वरुपी दुष्काळ असलेला हा भाग सिंचनाने सुजलाम-सुफलाम होणार आहे. पुढील तीन वर्षात ही योजना पुर्ण करण्यात येणार आहे. या योजनेसाठी लागणारा निधी कमी पडू दिला जाणार नाही . राज्यामध्ये सांगोला तालुका हा पूर्णतः दुष्काळमुक्त होण्याचा काम होत आहे. आणि याचे भाग्य मला मिळाले याचा आनंद आहे.पुढील पाच वर्षांमध्ये संपुर्ण महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी शासन शासन कटिबध्द आहे.

सांगोला तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी स्वर्गीय गणपतराव देशमुख यांनी अविरत प्रयत्न केले असून त्यांची आठवण आज आल्याशिवाय राहत नाही. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दुष्काळी भागासाठी अविरतपणे संघर्ष करुन माण खटाव तालुका पूर्णतः दुष्काळमुक्त केला आणि आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून हा जिल्हा दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. माजी आमदार शहाजी पाटील व माजी खासदार रणजिसिंह नाईक-निंबाळकर यांनी ही योजना मार्गी लावण्यासाठी सतत पाठपुरावा केला असल्याचे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी यावेळी सागितले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सांगोला तालुका पिढयान-पिढया दुष्काळाशी संघर्ष करीत असणारा शेतकरी दुष्काळ संपावयसाठी आस लावून बसलेला आहे. आज स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजेनेच्या कामांमुळे सांगोला तालुका पुर्णपणे दुष्काळमुक्त होणार आहे. पिढ्यान् पिढ्या दुष्काळाशी संघर्ष करणाऱ्या मातीचे दुख संपले आहे. माण-खटाव-फलटण -सांगोला तालुक्यातील दुष्काळ संपविण्यासाठी प्रयत्न केला असून ,सद्यस्थित माण-खटाव मध्ये शेतील मुबलक पाणी असून चार ते पाच साखर कारखाने आहेत. सातारा जिल्ह्यातील राजेवाडी तलावातील शिल्लक राहणारे पाणी सांगोला तालुक्याला देणार असून, दुष्काळ भागातील तुमचा सहकारी म्हणून कायम तुमच्या बरोबर उभा राहिन असेही त्यांनी यावेळी सांगतिले. तसेच दुष्काळी भागाच्या संघर्ष समितीचे अध्यक्ष बाळासाहेब विखे पाटील होते.. ज्या, कुटुंबातील माणसाने पाण्यासाठी संघर्ष केला होता. त्या बाळासाहेब विखे पाटील यांच्या मुलांच्या हस्ते या योजनेचा शुभारंभ होतोय. याचा अभिमान वाटत असल्याचे पालकमंत्री श्री गोरे यांनी सांगितले.

यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर, माजी आमदार शहाजी पाटील व माजी आमदार दिपक साळुंखे-पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी सर्व मान्यवरांनी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजेनेच्या संकल्प चित्राची पाहणी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### चोरट्याने पळविली पैसे असलेली बॅग

सोलापूर : सलगरवाडी येथील जाधव चहा कॅंटींग येथुन रोख रक्कम ९ हजार ७९५ रुपये असलेली काळ्या रंगाची रेग्झिन बॅग चोरून नेल्याची घटना १५ फेब्रुवारी रोजी घडली.




याप्रकरणी बालाजी नारायण गडगे (वय-२४,रा.भैया चौक,गायकवाड चाळ) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,फिर्यादी हा वरील ठिकाणी ऑक्सीग्रँड कंपनीच्या पाणी बॉटल कॅंटीनमध्ये देत होता.यावेळी वरील वर्णनाची व किमतीचे पैसे असलेली बॅग अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# जीबीएस साथ रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासन सज्ज : आ.समाधान आवताडे

## आ. आवताडे यांनी घेतली पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील प्रशासनाची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : Gbs साथ रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील प्रशासन सज्ज आहे, पंढरपूर नगरपालिका प्रशासन आणि ग्रामीण भागात आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, आशा वर्कर्स ताईंच्या मार्फत सर्व्हे सुरू आहे, पाणी तपासणी, अन्न पदार्थ तपासणे, मोहीम हाती घेतली जाईल, दूषित पाण्याची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आ. समाधान आवताडे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

पंढरपूर शहरात नुकतेच जी बी एस चे दोन रुग्ण आढळले होते. या पार्श्वभूमीवर सोमवारी आ. आवताडे यांनी प्रशासनाची बैठक पंढरपूर शासकीय विश्राम गृह येथे घेतली. या बैठकीस प्रांताधिकारी बी.आर. माळी,तहसीलदार सचिन लगोटे,मदन जाधव, पंढरपूर सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीकारी डॉ. महेश सुडके, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, नगरपालिका उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर, यांच्यासह विविध शासकीय विभागाचे अधिकारी, पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक उपस्थित होते.

प्रारंभी सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीकारी महेश सुडके यांनी जीबीएस साथीच्या बाबतीत माहिती दिली. त्याच बरोबर तालुका वैद्यकीय अधिकारी, पंढरपूर नगरपालिका उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर यांनी शहरातील नियोजनाची माहिती दिली.

यावेळी पुढे बोलताना आ. आवतडे म्हणाले की, पंढरपूर शहरात दोन जीबीएसचे दोन रुग्ण सापडले आहेत. नुकतीच माघी यात्रा संपन्न झाली, तसेच शनिवार, रविवारी शहरात लाखावर भाविक येत असतात. पुणे, मुंबई येथील जीबीएस साथीचे रुग्ण वाढलेले आहेत. या पाश्वभूमीवर सली चा प्रादुर्भाव वाढू नये साठी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका प्रशासनाने दक्षता घ्यावी. हा रोग मुख्यतः पाणी आणि अन्नातून प्रसारित होतो, हे लक्षात घेता पिण्याच्या पाण्याच्या योजना भीमा नदीवर अवलंबून आहेत, या पाण्यावर योग्य त्या तपासण्या



करण्यात याव्यात, पाणी शुद्धीकरण करण्याचे काम केले जावे, अशा सूचना केल्या.

# आंबेडकर जन मंच महाराष्ट्र राज्य संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी अतुल सोनकांबळे यांची निवड

## अतुल सोनकांबळे यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंबेडकर जन मंच महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या माध्यमातून समाजातील दुर्लक्षीत दुर्बल घटकातील व जनसामान्यांची सेवा करण्यासाठी आंबेडकर जन मंच महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून अतुल सोनकांबळे यांची निवड करण्यात आली

आंबेडकर जन मंच राष्ट्रीय संयोजक व राष्ट्रीय अध्यक्ष विलासजी म्हस्के व राष्ट्रीय अध्यक्ष दर्शन सिंग पंजाबी यांच्या आदेशानुसार ही निवड करण्यात आली असुन



आंबेडकरी चळवळीचा आवाज बुलंद करण्यासाठी व संपूर्ण महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळ मजबूत करुन जनसामान्यांची सेवा करण्यासाठी मी तत्पर असेन असे अतुल सोनकांबळे बोलता म्हणाले.

आंबेडकर जन मंच सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र कार्यध्यक्ष पदी अतुल सोनकांबळे यांची आज निवड करण्यात आली असे संस्थापक अध्यक्ष विलास मस्के राष्ट्रीय उपाध्यक्ष दर्शन सिंग पंजाबी राष्ट्रीय अध्यक्ष महिला आघाडी तुलसी मेहता राष्ट्रीय कमिटी च्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आल्याचे जाहीर करत शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय लोक अदालतीचे २२ मार्चला आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्य विधी सेवा प्राधिकरण, यांचे निर्देशानुसार सन २०२५ सालातील पहिले राष्ट्रीय लोकअदालत दि. २२ मार्च २०२५ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे.

या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बॅंक वसुली प्रकरणे, कलम ३८ एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बॅंक, सहकारी बॅंक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, नॅक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

सदरच्या लोकन्यायालयात ई-चलनाच्या प्रकरणात एस.एम.एस.द्वारा वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले जात आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येवू शकते. तसेच महा ट्राफिक या ॲपवरसुध्दा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरीक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जावून सदर रक्कम भरता येवू शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपुर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे.

**सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोकन्यायालयाच्या मार्गाने जाऊया**

सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपाली प्रकरणे तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांनी केले आहे.

**लोकन्यायालयाचे फायदे**

प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात.

लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते.

लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. होणाऱ्या वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

# वाजे विद्यालयाचा भव्यदिव्य सांस्कृतिक महोत्सव उत्साहात साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी( सोमनाथ गिरी):- नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित सिन्नरतालुक्यातील सिन्नर येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात, तालुका संचालक माननीय कृष्णाजीभाऊ भगत यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले, शालेय समितीचे सदस्य भाऊसाहेब गोजरे,बबनराव ठोक,अनिल गाडे,शालिनीताई देशमुख, ड.शिवानी बोरावे,विशाखा समिति उपाध्यक्षा, अर्जुनराव गोजरे, माजी मुख्याध्यापक बी.जी.थोरात, जे.बी.पगार,प्रा. राजाराम मुंगसे,एस.आर पगार,के.आर.गोसावी,खैरनार जी.एस,शिवनाथ कापडी,अनिल थोरात,रामदास वाजे, एकनाथ खैरनार, सोमनाथ गिरी,सचिन विघे सहसचिव पालक शिक्षक संघ,भरत शिंदे उपाध्यक्ष पालक शिक्षक संघ,वर्षा सोनवणे,दत्तात्रय लोंढे,वृक्षमित्र विष्णु वाघ, विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख, पर्यवेक्षक अशोक निंबाळकर व रामदास ढोली उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते नटराज व शिवाजी महाराज यांचे प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे विद्यार्थ्यांनी स्वागतगीताने स्वागत केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणे किती महत्वाचे आहे हे सांगितले.

त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.त्यामध्ये गणेशवंदना, आदिवासी नृत्य,देवीची वेगवेगळी रुपे घेतलेली गीते,महाराष्ट्र दर्शन घडविणारे गीत,अध्यात्मिक दर्शन घडविणारे विठु माऊली,कोळी नृत्य,प्रभु श्रीराम यांच्यावरील मेरे राम घर आएंगे, लावणी नृत्य,भांगडा,गरबा नृत्य,काश्मिरी नृत्य,बुमरो गीत,आकर्षक व वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. सदर कार्यक्रमात ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यात सर्वाचे लक्ष वेधून घेणारा शिवाजी महाराज यांचा हुबेहुब दर्शन घडविणारा शिवराज्याभिषेक सोहळा या सोहळ्याने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. सदर स्नेहसंमेलनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. पालकांसह प्रेक्षकांनी विद्यार्थ्यांवर बक्षिसांचा वर्षाव केला . जवळपास अडीच ते तीन हजार प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला .हा भव्यदिव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक समिति सदस्य,विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका ,शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले.जितेंद्र शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपस्थितांचे आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास ढोली यांनी मानले.

# श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी येथे वार्षिक पारितोषिक वितरण व सत्कार समारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील बाहुबली विद्यापीठ संचलित श्री सरस्वती हायस्कूल शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण व मान्यवरांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

गुणवंत विद्यार्थी, आदर्श विद्यार्थी, क्रीडा स्पर्धेमध्ये नावाजलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

शाळेला नेहमी मोलाचे योगदान लाभलेले श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुलदादा घाटगे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोषाध्यक्ष श्री बाहुबली विद्यापीठ बाहुबली, सत्कारमूर्ती स्वरूपाताई यड्रावकर, अशोकराव माने आमदार हातकलंगडले, राहुलदादा घाटगे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर श्री गुरुदत्त शुगर्स यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती श्रीमती मंगल बिरणगे सरपंच ग्रामपंचायत टाकळीवाडी, डी.सी. पाटील महामंत्री बाहुबली विद्यापीठ बाहुबली, सुरेश चौगुले सहसचिव समन्वय समिती तसेच जितेंद्र कोथळी चेअरमन शालेय समिती, हरिभाऊ पाटील भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष, भरमु बदामे, बाबासाहेब वनकोरे, कुशाल कांबळे, प्रकाश गोरवाडे, चंद्रकांत निर्मळे, रमेश निर्मळे, केंदबा कांबळे, पालक विद्यार्थी, विद्यार्थिनी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालक संजय तपासे मुख्याध्यापक श्री सरस्वती हायस्कूल, शिक्षक, शिक्षिका, यांच्या परकष्टातून संपन्न झाला.

**पंढरीत १९ लाख २० हजाराचा गुटखा जप्त**

**पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरणची कामगिरी**

# पंढरपूर शहर पोलिसांकडून अवैध गुटखा वाहतुकीवर मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरामध्ये एक मालवाहतूक बोलेरो पिकप सह १९ लाख २० हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य मुद्देमाल ताब्यात.

पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीसदार अंमलदार यांना गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की एक पांढरे बदामी कलर चे पिकप मध्ये प्रतिबंधित हो विक्रीस मनाई केलेला गुटखा आज सांगोल्याच्या दिशेने पंढरपूर कडून टेंभुर्णी कडे जात असताना गोपनीय माहिती मिळाली पंढरपूर शहर अंमलदार यांनी पंढरपूर शहर सांगोला रोडवर विक्रम धाब्या समोर सापळा लावला रात्री ०९/३० सुमारास बातमीतील वर्णनाचा मालवाहतूक पिकप विक्रम धाब्यासमोर रोडवर आला असता गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांनी पिकप थांबून पिकप मला बाबत सुगंधित पान मसाला आर. एमडी पान मसाला, व यम संबंधित तंबाखू असलेली सांगितली. सदरचा पिकअप हा.न.एम.एच.१०डी. टी४५१७ व त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये प्रतिबंधात्मक विक्री करण्यास मनाई असलेल गुटख्यासह पिकप चालकासह ताब्यात घेऊन शेजारचा मुद्देमाल पोलीस ठाण्यात आणून अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्री उमेश भुसे यांच्याशी संपर्क करून पुढील कारवाई करण्यात आली.

जप्त केलेला पिकप प्रतिबंधित केलेला गुटखा एकूण मुद्देमाल खालील प्रमाणे

१)६,००,०००/रु. अंदाजे किमतीचा विमल पान २५. पोते

२)१,९८,०००/रु. अंदाजे किमतीचा किंग पॅक विमल कंपनीचा पान मसाला०५ पोते

३)६०,०००/रु. अंदाजे किमतीचे एम कंपनीचे संबंधित तंबाखू-१०० बॉक्स

४)९०,०००/अंदाजे किमतीचा एम आर डी कंपनीचा पान मसाला-१०० बॉक्स.

५)१,५०,०००/रु. अंदाजे किमतीचा व्ही कंपनीची सुगंधी तंबाखू ०५.पोती.

६)२२,०००/रु. अंदाजी किमतीचे बी कंपनीची सुगंधी तंबाखू.-०१पोते

७)८०,००००/रु व्ही एम बोलोरो कंपनीचे पिकप.न. एम एच १०.डी.टी.४५१७.

एकूण १९ ,२०,००० किमतीचा मुद्देमाल चालकासह ताब्यात घेतला.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर, उपविभागीय पोलीस




अधिकारी पंढरपूर विभाग श्री अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री विश्वजीत घोडके , यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने प्रभारी .सपोनि. आशिष कांबळे, श्रेणी.पोसाई. राजेश गोसावी,सापोफो. शरद कदम, कल्याण वडने, सुरज हेंबाडे, सचिन हेमाडे, प्रसाद औटी, पोलीस नाईक सचिन इंगळे,पोको. शाही मडले, समाधान माने, बजरंग बिचुकले, निलेश कांबळे, तुकाराम वरे, यांनी काम केले.



# पंढरपूर पंचायत समिती बि.डी.ओ. व ग्रामसेवक यांच्यावर कलम ९२ प्रमाणे गुन्हा दाखल करावा यासाठी पालकमंत्री गोरे यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस स्टेशनला प्रहार संघटनेने पंढरपूर पंचायत समिती बी.डी.ओ. ग्रामसेवक कलम ९२ प्रमाणे गुन्हा दाखल करावा यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन पत्र देण्यात आले आहे.

लवकरच चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. तरीदेखील येणाऱ्या दोन दिवसात गुन्हा दाखल झाला नाही तर शेकडो दिव्यांग शहर पोलीस स्टेशन समोर आंदोलन करणार असल्याचे यावेळी प्रहार संघटने कडून सांगण्यात आले अशा प्रकारची निवेदने शहर पोलीस स्टेशनला लवकरच देणार असल्याचे यावेळी सांगितले.

## थोडक्यात...




### एसटी अपघात प्रकरणी चालकावर गुन्हा

सोलापूर : सोलापूर ते अक्कलकोट हायवे रोडवर कुंभारी तालुका दक्षिण सोलापूर टोलनाक्याजवळ एसटी बस (क्रमांक एम एच १३ सी यु ७९०३) ही भरधाव हायगईने चालवून कुंभारी टोलनाका येथे टोल देण्यासाठी उभे असलेल्या वाहनाला धडक दिल्याचे घटना १६ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी प्रवासी सुनंदा बसवराज होनमुर्गी (वय-४२,रा.हन्नुर ता. अक्कलकोट) यांनी वळसंग पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून एसटी चालक हनुमंत भानुदास नागरगोजे (व्यवसाय एसटी चालक,देवगड आगार,जि.सिंधुदुर्ग,रा. लिंबाखाना,ता.शिरूर कासार,जि.बीड) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, रविवारी (दि.१६) फेब्रुवारी रोजी यातील संशयित आरोपी यांनी त्यांच्या ताब्यातील बस हयगईने भरधाव वेगाने चालवून कुंभारी टोल नाका येथे टोल देण्यासाठी उभे असलेल्या वाहनाला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातामध्ये बसमधील प्रवासी धडक दिलेल्या वाहनाचे चालक हे गंभीर व किरकोळ जखमी झाले. तसेच धडक दिलेल्या वाहनाचे नुकसान करण्यास चालक जबाबदार असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त

# सर्व यंत्रणांनी जय शिवाजी जय भारत पदयात्रा यशस्वी करण्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे

## अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांचे निर्देश




- **नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवन उद्यान पर्यंत जय शिवाजी जय भारत पदयात्रेचे आयोजन**
- **या पदयात्रेत मोठ्या प्रमाणावर शिवप्रेमी विद्यार्थी, नागरिक तसेच शासकीय यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांनी सहभागी व्हावे**
- **माय भारत पोर्टल पवर जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन, जिल्ह्यातील रील स्टार यांनीही सहभागी होऊन रील बनवण्याचे आवाहन**

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आहे. यानिमित्ताने केंद्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यामध्ये जय शिवाजी जय भारत पदयात्रा राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अनुषंगाने सोलापूर येथे नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवन उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत हजारो विद्यार्थी, नागरिक, अधिकारी-कर्मचारी यांची जय शिवाजी जय भारत पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी ही पदयात्रा यशस्वी करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी त्यांच्यावर दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जय शिवाजी जय भारत पदयात्रा आयोजनाच्या पूर्व तयारी बाबतच्या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर बोलत होत्या. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, तहसीलदार सर्वश्री श्रीकांत पाटील, निलेश पाटील, किरण जमदाडे यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर पुढे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी दहा ते अकरा या कालावधीत नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता ते रंगभवन उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत हजारो विद्यार्थी, नागरिक यांची जय शिवाजी जय भारत पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. प्रारंभी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या यात्रेनिमित्त हजारो विद्यार्थी, नागरिक अधिकारी, कर्मचारी यांच्याशी नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सकाळी ९.३० वाजता संवाद साधणार आहेत.

यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे मंडप व्यवस्था तसेच स्क्रीनची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यानंतर सकाळी दहा वाजता पदयात्रेचा शुभारंभ होणार आहे त्या दृष्टीने क्रीडा विभाग व अन्य संबंधित विभागाने पदयात्रा आयोजन यशस्वी होण्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे, असे त्यांनी निर्देशित केले.


पोलीस विभागाने पदयात्रेदरम्यान वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवावी तसेच पदयात्रेच्या मार्गावर इतर ठिकाणाहून वाहने येणार नाहीत ह्या अनुषंगाने चोख बंदोबस्त ठेवावा. महापालिकेने पदयात्रा मार्गावर ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करावी तसेच या ठिकाणावर स्वच्छता राहील या दृष्टीने प्रयत्न करावेत व आरोग्य पथके ही तैनात करावेत, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर यांनी देऊन आरोग्य, शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, पुरवठा विभाग, माहिती विभाग यांनी दिलेली जबाबदारी समन्वय ठेवून पार पाडावी. क्रीडा विभागाने सर्व विभागात योग्य समन्वय ठेवावा. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे मंडप व्यवस्था करावी. तसेच विद्यार्थी, नागरिकांना बसण्याची व्यवस्था करावी. माननीय प्रधानमंत्री यांच्या संबोधन प्रसंगी आवश्यक यंत्रणा उभी करावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी जय शिवाजी जय भारत पदयात्रा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागावर देण्यात आलेली जबाबदारी सांगितले तसेच याप्रमाणे सर्वांनी परस्परात समन्वय ठेवून काम करण्याचे आवाहन केले. महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या यात्रेसाठी महापालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी जय शिवाजी जय भारत पदयात्रा व त्या अनुषंगाने अन्य बाबीची सविस्तर माहिती बैठकीत दिली.

# सकारात्मक जीवन जगण्यासाठी मन स्थिर करता आले पाहिजे : व्याख्याते देशमुख

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : इंदापूर: सकारात्मक जीवन जगण्यासाठी मन स्थिर करता आले पाहिजे असे प्रतिपादन व्याख्याते प्रशांत देशमुख यांनी व्यक्त केले.



इंदापूर शहर शिवजयंती उत्सव समिती आयोजित मालोजीराजे व्याख्यानमालेतील जगणं सुंदर आहेया विषयावर त्यांनी प्रथम पुष्प गुंफले.व्याख्यानमालेचे उद्घाटन कामधेनू परिवाराचे मार्गदर्शक समाजभूषण डॉ.लक्ष्मणराव आसबे यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक देवराव लोकरे होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा शिवसेना महिला प्रमुख सीमा कल्याणकर, इंदापूर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष दिलीप वाघमारे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष ॲड.इनायतअली काझी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रशांत देशमुख पुढे म्हणाले की, मनाला स्थिर करण्यासाठी योगा, मेडिटेशन, नामस्मरण केले पाहिजे. सुखी जीवनाचा पासवर्ड त्यांनी श्रोत्यांना सांगितला. माझी चूक झाली मला मान्य आहे, हे तू फारच छान केलेस, तुझं मत काय, एवढं कृपया करशील का, आभारी आहे, तसेच आपण हे करूयात का? किंवा आपण हे केले आहे. या गोष्टी आपण अंगीकारल्या की तर जगणं सुंदर आहे. ग.दि. माडगूळकर, कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अनेक कविता त्यांनी सादर केल्या. युवकांनी रायगड ही प्रेरणा ठरवली पाहिजे.जीवनात यश अपयश आले तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुरंदरचा तह डोळ्यासमोर ठेवला पाहिजे तरच जगणं सोपं होईल. यावेळी लक्ष्मणराव आसबे व देवराव लोकरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक व्याख्यानमालेचे अध्यक्ष कैलास कदम यांनी केले.स्वागत कार्याध्यक्ष सुनील गलांडे व शरद झोळ यांनी केले. सुत्रसंचालन संतोष नरूटे यांनी तर आभार अमोल खराडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी योगेश गुंडेकर,दत्तराज जामदार, अनिकेत साठे, विशाल गलांडे, अमोल साठे, तुषार हराळे, सचिन जगताप, ओम जगताप, आदित्य कदम यांनी प्रयत्न केले.

# निफाड सायकलीस्टच्या वतीने निफाड ते किल्ले शिवनेरी सायकलिंग

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : रविवार दि १६ फेब्रु २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतनिमित्त निफाड ते किल्ले शिवनेरी अशी १६५ किमी सायकलिंग पुर्ण करत अभिवादन करण्यात आले. असुन याप्रसंगी सकाळी ५.०० वाजता नगरसेवक देवदत्त कापसे, जावेद भाई शेख, संजय कहाने, सचिन नकाते ई मान्यवरांनी छ शिवाजी स्मारक, निफाड येथून झेंडा दाखवुन शुभेच्छा दिल्या. यात राजाभाऊ गवळे, अथर्व नकाते, पांडुरंग कडवे, चि प्रसाद कडवे, सचिन सोमवंशी, प्रविण तनपुरे यांनी सहभाग नोंदविला. निफाड म्हाळसाकोरे, बारागाव पिंपरी, सिन्नर, संगमनेर, जुन्नर या मार्गे राईड पुर्ण केली. सहभागी सायकलीस्ट यांचे राईड पुर्ण केले बद्दल नासिक सायकलीस्टचे अध्यक्ष किशोर काळे, डॉ महाजन, संचालक दिपक भोसले, बाबु दादा ताजनपुरे, सुर्यकांत आहेर, प्रविण कोकाटे, सुरेश डोंगरे, रामदास सोनवणे, सतिष कुलकर्णी व मान्यवर यांनी सर्व सायकलीस्टचे अभिनंदन केले.

# स्त्री भ्रूण हत्या, मुलींच्या शिक्षणासाठी पोलीस प्रशासनाकडून जनजागृती बाईक रॅली

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथे कन्या सप्ताह निमित्त मुलगी वाचावी, मग मुलींची शालेय प्रगती होण्यासाठी जनजागृती बाईक रॅली काढण्यात आली.



उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या सहकाऱ्यांनी बेटी बचाव बेटी बचाव स्त्री भून हत्या याबाबत सर्वसामान्य नागरिकांना याद्वारे प्रबोधन करण्यात आले.

सदर रॅलीमध्ये पंढरपूर तालुका पंढरपूर शहर पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे महिला अधिकारी महिला अंमलदार माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हे अधिकारी कोष्टाप यांनी सदर बेटी बचाव बेटी बचाव रॅलीमध्ये सहभाग घेतला व पंढरपूर शहरातील स्टेशन रोड, प्रदक्षणा मार्ग, भोसले चौक, भादुले चौक, नाथ चौक, गांधी रोड येथून अत्यंत उत्साही वातावरण रॅली काढण्यात आली व मुलगी हा कुटुंबाला भार नसून तीच अनेकदा कुटुंबाचा आधार ठरू शकते असा संदेश देण्यात आला.

नागरिकांना मुलगी जनसामान्याचा आनंद व्यक्त करायला हवा, जुने बुरसटलेले विचार, व संकुचित मानसिकता त्या घरी पाहिजे, असा संदेश या बेटी बचाव यामधून देण्यात आला.

# स्वावलंबन ते सक्षमतेचा प्रवास; युथ फॉर जॉब फाऊंडेशनचा दिव्यांगकरिता निओ मोशन प्रकल्प

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : युथ फॉर जॉब फाऊंडेशन आयोजित निओ मोशन या उपक्रमांअंतर्गत मुंबई तसेच नवी मुंबई शहरातील २५ दिव्यांग युवकांना आज बजाज तर्फे निओ मोशन इ वाहन वाटप करण्यात आले.




या कार्यक्रमाला सोशल वेलफेअर कमिशनर रविराज इलवे सर तसेच समाज कल्याण विभाग कार्याध्यक्ष संगीता गायकवाड उपस्थित होत्या.

या उपक्रमांतर्गत दिव्यांग युवकांना युथ फॉर जॉब फाऊंडेशन द्वारा प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बजाज तर्फे निओ मोशन वाहन देण्यात आले आहे. या प्रशिक्षित युवकांना झोमॅटोसारख्या नामांकित कंपनीमध्ये डिलीव्हरी पार्टनर म्हणून स्वतःची एक नवीन ओळख निर्माण करता येणार आहे. ज्यामुळे दरमहा १५ ते २० हजार कमवून आपला तसेच कुटुंबाला आर्थिक हातभार लावू शकतील.

युथ फॉर जॉब फाऊंडेशन निओ मोशन प्रकल्पाचे प्रोग्राम लीड सूर्यकांत फडके , प्रशिक्षक प्रियांका लब्दे व हर्षद कासले यांनी या कार्यक्रमाचे मुंबई स्टीफन हायस्कूल येथे आयोजन केले होते. युथ फॉर जॉब फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीरा शेनोय तसेच प्रोग्राम हेड समीर यांच्या निओ मोशन या प्रकल्पामुळे दिव्यांग युवकांनी स्वावलंबन ते सक्षमतेकडे पहिले पाऊल उचलले असे म्हणायला हरकत नाही.

**भव्य दिव्य आणि अविस्मरणीय सोहळ्याचे साक्षीदार व्हा : शिवजन्मोत्सव समितीचे आवाहन**

**१९ फेब्रुवारी २०२५ रोजी कळस व पालखी मिरवणूक**



# मेरा बुद्रुक येथे जिल्ह्यातील सर्वात उंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे आज अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असलेले मेरा बुद्रुक येथे लोकसहभागातून बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात उंच असलेली छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे अनावरण मेरा बुद्रुक येथील मुख्य रस्त्यावरील चौकात आज दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ वार मंगळवार रोजी सायंकाळी सात वाजता होणार असून, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात उंच अश्वारूढ आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडणार आहे, तसेच सार्वजनिक महाआरती सायंकाळी सात वाजता होईल. कळस व पालखी मिरवणूक बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता होईल, नऊ ते बारा वाघे मंडळ कार्यक्रम राहील अशी माहिती शिवजन्मोत्सव सोहळा समिती मेरा बुद्रुक यांनी दिली आहे.अनावरण सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. आकर्षक छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करण्यासाठी भव्य उंच मंच,सभोताल हिरवी आकर्षक उंच झाडे, विद्युत रोषणाई,भगवे झेंडे,आकर्षक रांगोळी,मंगलवाद्यासाठी नामांकित ढोल ताशा पथक, आकर्षक लेझीम ही उद्याच्या अनावरण सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्याची उत्सुकता शिगेला पोहचली असुन, या भव्यदिव्य ऐतिहासिक अशा सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन शिवजन्मोत्सव सोहळा समिती मेरा बुद्रुक यांनी केले आहे.

